


रु. 12.00 ISBN 81-237-2198-6

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

NEHRU BAL PUSTAKALAYA



# सुरस गोष्टी

मनोज दास

अनुवाद
लीलावती भागवत

*नेहरू बाल पुस्तकालय*

# सुरस गोष्टी

लेखक

**मनोज दास**

चित्रकार

**मारिओ**

अनुवाद

**लीलावती भागवत**

**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**

ISBN 81-237-2198-6

पहिली आवृत्ती : 1970 (*शके* 1992)

आठवी आवृत्ती : 2003 (*शके* 1924)

मूळ © मनोज दास, 1970

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1970

Stories of Light and Delight *(Marathi)*

रु. 12.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.



## राजा आणि खार

एक होता राजा. त्याला आपण सर्वश्रेष्ठ आहो याचा फार अभिमान वाटत असे. राजा तरुण होता, विद्वान होता, बुद्धिमान होता येवढेच नव्हे तर त्याचे सामर्थ्य आणि शौर्य यांची बरोबरी करणारा एकही तरुण त्याच्या राज्यात नव्हता. शिवाय त्या राज्यातला तो सर्वांत श्रीमंत मनुष्य समजला जात असे.

एक दिवस तो असाच आपल्या बागेत हिंडत होता. त्याच्याबरोबर होता त्याचा शाहाणा म्हातारा प्रधान. राजा प्रधानाला म्हणाला, "प्रधानजी, मला नाही वाटत माझ्यासमोर कुणी येऊन मला म्हणेल की "राजा मी तुझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे. कुणाला धीरच होणार नाही असं म्हणायचा. मी सर्वच बाबतींत इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे



हे पाहून मला इतका आनंद होतो."

म्हातारा प्रधान, हा तरुण राजा जे काय म्हणे त्याला कधीच विरोध करीत नसे. त्याने काहीच उत्तर दिले नाही. तो नुसता हसला देखील नाही.

राजाला फार आश्चर्य वाटले. तो म्हणाला, "प्रधानजी तुम्ही असे गप्प का?"

प्रधान हसून म्हणाला, "महाराज, खरं सांगू का, आपल्यापुढे कुणीही प्रौढी मिरवणार नाही याबद्दल कुणी कधीच खात्री बाळगू नये. राज्यात तुम्ही सर्वश्रेष्ठ आहात हे कबूल, पण काही लोकांना हे माहीत नसण्याची शक्यता आहे. प्रत्येकजण स्वतःला श्रेष्ठच समजतो. आपण नेहमी बघतो नाही का, की एखादा रडतराऊत सुद्धा स्वतःला वीरशिरोमणी समजतो. तेव्हा राजेसाहेब, तुमच्या श्रेष्ठपणाची कल्पना नसलेलं कुणी एखादे दिवशी तुमच्यासमोर स्वतःची प्रौढी मिरवणं शक्य आहे. पण दुसऱ्यांच्या या प्रौढी मिरवण्याकडे लक्ष देणं म्हणजे स्वतःची मनःशांती बिघडवून घेण्यासारखं आहे."

प्रधानाचे हे बोलणे चालू असतानाच एक पिटुकली खार टुणकन् उडी मारून तेथे आली आणि त्यांच्यासमोरच एका संगमरवरी खांबावर चढून बसली. खारीने आपल्या पुढच्या पायात धरले होते एक नाणे, अगदी राजाला आणि प्रधानाला दिसेल असे.





राजाला त्या खारीची गंमत वाटली. राजाला हसत असलेला पाहून खार गाऊ लागली.

**मी येवढी श्रीमंत**
**राजाजवळ कुठाय पैसा**
**बिचारा रडत चिडत**
**माझ्याकडे बघतोय कसा**

राजाला फार राग आला. प्रधान काही म्हणणार त्याच्याआधीच राजा खारीच्या अंगावर धावून गेला. खार सटकली पण तिने नाणे खाली टाकून दिले. राजाने ते नाणे उचलले आणि प्रधानाकडे बघून मोठ्या खुशीत हसला. प्रधान अर्थातच काही बोलला नाही.

संध्याकाळी राजा आणि प्रधान शेजारच्या राज्यातल्या काही राजदूतांबरोबर महत्त्वाची चर्चा करीत बसले होते. अचानक त्यांना वरून कुठूनतरी खारीचे बोलणे ऐकायला आले.

**राजा झाला श्रीमंत, मिरवतोय गर्वाने**
**माहीत आहे कशामुळे? अहो माझ्याच पैशाने...**

राजा रागाने लाल झाला. पण समोर बसले होते त्याचे पाहुणे. तेव्हा करतो काय? त्याला राग गिळावा लागला. खार मात्र या खांबावरून त्या खांबावर टुणटुण उड्या मारीत होती. हेच गाणे गात होती. राजदूतांनी ते ऐकले पण ते हसले नाहीत की बोलले नाहीत कारण त्यांना वाटले असे काही केले तर राजाचा अपमान होईल.

सगळे पाहुणे आपापल्या खोल्यांमधे निघून गेले. ते गेल्याबरोबर राजा खारीला शोधू लागला. त्याने सगळीकडे शोधले पण त्याला खार काही सापडली नाही. रागाने तो अगदी बेचैन झाला. रात्रभर त्याला झोप आली नाही.

राजाचा नेम होता, की सगळी दुसरी कामे सुरू करण्यापूर्वी गरिबांना दानधर्म करायचा. दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे तो गरिबांना दान देत होता. तेवढ्यात खार दारात येऊन म्हणाली,

**राजा मोठ्या ऐटीने, बसलाय दान वाटीत**
**पण माझाच सारा पैसा आहे त्याच्या मुठीत**

राजाला राग आला, त्याने आपल्या शिपायांना सांगितले, "जा रे त्या खारीला पकडून आणा." पण खार त्यांच्या हातून निसटली. राजाला पुन्हा एकदा आपला राग आवरावा लागला.

आणखी थोडे तास गेले. राजाची जेवायची वेळ झाली. तो पानावर बसला, तेवढ्यात खार खिडकीत चढून बसली आणि म्हणाली,

**राजेसाहेब जेवताहेत**
**मांडली आहेत पानं**
**पण माझ्याच तर पैशाने**
**इतकी शिजली पक्वानं**

राजाचा राग इतका अनावर झाला की त्याला एक घास देखील गिळेना. त्याचे नोकर खारीला पकडायला धावले पण खार आसपास कुठेच दिसेना.

त्याच दिवशी रात्री राजा पुन्हा जेवायला बसला. तो घास उचलून तोंडात घालणार तेवढ्यात खार त्याच्या समोर येऊन म्हणाली,

राजेसाहेब जेवताहेत........



आणि सकाळचे गाणे पुन्हा गुणगुणू लागली. राजाला घास गिळेना. तो उपाशीच पानावरून उठला.

राजाला काहीच सुचेना. त्याने आपल्या खिशातले त्या खारीचे नाणे काढून तिच्याकडे फेकले. खारीने ते पटकन् उचलले. पण ते घेऊन जाताना म्हणाली,

**खारूबाई, तुमचा विजय झाला**
**सांगते जाऊन साऱ्या जगाला**
**राजा मला भ्यायला**
**माझा पैसा परत दिला**

एखादया वेडयासारखा राजा खारीमागे धावला. पण खार दिसेनाशी झाली. त्या रात्रीही राजाला झोप आली नाही. रात्रभर ते खारीचे शब्द त्याला बोचत होते. त्याच्या कानात घुमत होते.


सकाळी राजा आपल्या प्रधानाला म्हणाला,

"प्रधानजी, मला वाटतं माझ्या सगळ्या सैनिकांना बोलवावं आणि राज्यातल्या सगळ्या खारींना ठार मारण्याचा हुकूम दयावा. याखेरीज आता उपायच उरला नाही." प्रधान म्हणाला, "महाराज, मला तुमच्या रागाचं कारण समजतं. पण असं

पाहा, राज्यातल्या सगळ्याच्या सगळ्या खारींना ठार मारण्यात आपल्या सैनिकांना यश येईल याची खात्री आहे का. लक्षावधी खारी आपल्या शेतात, माणसं जाऊ शकणार नाहीत अशा दाट जंगलांत, पर्वताच्या उंच उंच शिखरावर, सगळीकडे पसरलेल्या असतील. शिवाय आपल्या राज्यात प्रवेश करायला खारीला काही परवाना लागत नाही. तेव्हा शेजारच्या राज्यातूनही खारी आपल्या राज्यात येऊ शकतील. शिवाय आपले एवढे शूर सैनिक, त्यांना खारींशी लढायला सांगितलं, आणि ती लढाई जिंकताही येत नाही असं दिसून आलं की ते निराश होतील. त्यांना वाईटही वाटेल. आणि इतकं करूनही आपल्याला चिडवणारी ती खट्याळ खार त्यांच्या हातून निसटली तर सगळे श्रम फुकटच. शिवाय आपले प्रजाजन काय म्हणतील? इतिहासकार आपल्याबद्दल काय लिहितील? समजा उदयाच्या विदयार्थ्यांनी इतिहासाच्या पुस्तकात वाचलं की, कोणे एके काळी एक राजा होता. त्याने आपले सैनिक खारीशी लढायला पाठवले. तर हे सुद्धा विचित्रच नाही का वाटणार?"

"पण मग मी करू काय?" राजाने वैतागाने विचारले.

"महाराज, त्या खारीकडे अगदी दुर्लक्ष करा. ती खार पहिल्यांदा बागेत आली तेव्हाच तुम्ही तिच्याकडे मुळीच लक्ष दिलं नसतंत, किंवा मुळीच न रागावता





तिचं प्रौढीचं भाषण नुसतं ऐकून घेतलं असतंत तरी तुम्ही असे बेचैन झाला नसतात. पण अजूनही काही बिघडलं नाही. चांगल्यासाठी माणसानं केव्हाही आपलं वागणं बदलावं."

थोडयाच वेळाने खार राजासमोर आली आणि पुन्हा म्हणाली.


**राजा मला भ्यायला**
**माझा पैसा परत दिला...**

राजा मुळीच रागावला नाही. उलट हसून म्हणाला.

**खारूबाई तुम्ही हुशार नि श्रीमंत**
**राजापेक्षा श्रेष्ठ सारं जग जाणतं**
**कोंबडी देते जांभई मोठा आ वासते**
**माझं तोंड समुद्राहून मोठ्ठं आहे म्हणते.**

खार हे ऐकून चांगलीच दचकली. राजाकडे आश्चर्याने पाहू लागली आणि मग एक शब्दही न बोलता गुपचूप तेथून जी नाहीशी झाली ती पुन्हा कुणालाच कधी दिसली नाही!






## कानगोष्ट

फार फार वर्षांपूर्वी एका गावात रघू आणि राजू नावाचे दोन मुलगे राहात होते दोघेही एकाच वयाचे होते, एकाच शाळेत शिकत होते.

रघू प्रामाणिक आणि कष्टाळू होता. त्याच्या आईवडिलांना आणि शिक्षकांनाही त्याच्याबद्दल फार अभिमान वाटे. पण राजू काही तसा नव्हता. तो हुशार होता पण अगदी अप्रामाणिक. परीक्षेच्या वेळी दुसऱ्या विद्यार्थ्यांची उत्तरे तो चोरून बघायचा. लिहून काढायचा आणि शिक्षकांना फसवायचा. त्याला फक्त स्वत:बद्दलच प्रेम होते. पण खोटेखोटे हसून आणि तोंडदेखले गोड बोलून तो सर्वांना असा काही चकवायचा की त्याचा स्वार्थीपणा कुणाला कळायचा नाही.



रघू आपल्याला मदत करीत नाही म्हणून राजूला तो आवडत नसे. कुणाला फसवायचे असले किंवा चोरी करायची असली की राजू रघूची मदत मागे. पण रघू नेहमी त्याला सांगे, “हे बघ, सत्कृत्यासाठी तुला कधी माझी मदत लागली तर ती दयायला मला आनंदच वाटेल. पण असल्या दुष्कृत्याच्या बाबतीत मी ती कधीच देणार नाही.”

शिक्षण पूर्ण झाले आणि राजू एका मोठ्या शहरात राहायला गेला. रघू आपल्या छोट्याशा गावात अगदी साधेपणाने राहायचा, आणि त्याच्या वडिलांनी त्याला दिलेल्या एका जमिनीच्या तुकडयाची मशागत करायचा. तो सर्वांचा फार आवडता होता आणि गावातली सगळी मंडळी त्याच्यावर फार प्रेम करीत.

अशीच खूप वर्षे लोटली, रघू आणि राजूचे मार्ग अगदी वेगवेगळे होते. त्यांची दोघांची कधी गाठही पडली नाही. पण एक दिवस रघूच्या कानावर आले की राजूच्या हुषारीवर खूष होऊन राजाने त्याला आपला पंतप्रधान नेमले आहे. रघूला हे ऐकून बरे वाटले नाही, कारण राजू अप्रामाणिक होता. पण दुसऱ्याच्या भानगडीत तो कधीच पडत नसल्याने त्याला त्याचे वाईटही वाटले नाही.

एकदा त्या गावात काहीतरी उत्सव होता. त्या उत्सवाचे सामान खरेदी करण्यासाठी रघूला शहरात जायचे होते. तो दुपारी शहरात पोहोचला. ऊन खूप तापले होते आणि रघू दमला होता. त्याला तहान लागली होती. जवळच एक भव्य इमारत दिसली म्हणून तो त्या इमारतीत शिरला आणि तिथल्या नोकराजवळ प्यायला पाणी मागणार तेवढयात त्या इमारतीचा मालक बाहेर आला आणि म्हणाला “कोण रघू? अरे तू इथे काय करतो आहेस?”

रघूने राजूला आधी ओळखलेच नाही. राजूचे कपडे भरजरी होते. तो चालू लागला की मागे आंगरख्याचा रेशमी घोळ जमिनीवर लोळायचा. गळ्यातला सोन्याचा कंठा आणि हातातल्या हिऱ्याच्या आंगठ्या उन्हात चमचमत होत्या. आणि त्याच्या डोक्यावर सोन्याचांदीने मढवलेली—मधोमध, नीलमणी असलेली सुंदर झगमगीत पगडी होती. शिवाय राजू भोपळ्यासारखा गरगरीत फुगला होता.

रघूने राजूला थोड्या वेळाने ओळखले आणि प्रेमाने हाक मारली. पण राजूने हाकेला ओ दिलीच नाही. उलट कळवळा येऊन तो म्हणाला, "अरेरे, रघू, काय ही तुझी दुर्दशा, कसले दरिद्री कपडे तुझे. आणि मला वाटतं तू येवढा प्रवास पायीच केला असावास. अरे घोडा नाहीतर नाही पण तुझ्याजवळ एखादं खेचरदेखील नसावं? काय ही अवस्था तुझी. नाही तर मी. बघ तर मी कसा दिसतो? राजासारखा दिसतो की नाही? माझे कपडे तर बघ. माझं घर बघ. अरे देवसुद्धा माझा हेवा करतात. केवळ माझ्या गुणांमुळेच मी या श्रेष्ठ पदाला पोहोचलो आहे. आणि तू मूर्ख, तुझ्याजवळ साधं खेचरही नाही."

रघू म्हणाला, "मी गरीब असेन पण मी पूर्ण समाधानी आहे. आणि मी मूर्ख नाही हे तुला पक्कं ठाऊक आहे. मी मनात आणलं तर तुझ्यासारखं वैभव आणि सत्ता मिळवू शकेन. पण तुझ्या क्लृप्त्या योजणं मला बिलकूल पसंत नाही."

"चूप." राजू ओरडला. "येवढी जर तुझी लायकी आहे तर माझ्या घरी भीक मागायला कशाला आलास?"

"मी भीक मागायला आलो नाही इथे," रघू म्हणाला, "मला तहान लागली होती म्हणून भांडंभर पाणी प्यायला मागण्यासाठी मी इथे आलो; मला ठाऊकही नव्हतं की हे घर तुझं आहे."





"पाण्याचा एक थेंबही तुला मिळणार नाही. चल चालता हो." राजू रागाने थरथरत्या आवाजात ओरडला.

"ठीक आहे भैया, जातो मी." रघू येवढे बोलून शांतपणे तेथून निघून गेला.

पण तेवढ्याने राजूचे समाधान झाले नाही. त्याने आपल्या दोघां नोकरांना सांगितले, "या माणसाला गचांडी देऊन रस्त्यात फेका."

आता मात्र रघू रागाने म्हणाला, "मी तुझं काहीच वाईट केलेलं नाही. मला असं निष्कारण छळलंस तर तुझं दुर्दैव ओढवलंच म्हणून समज."

राजू पुन्हा ओरडला. "माझं काहीच वाईट केलं नाही म्हणतोस? परीक्षेत मला मदत करायचं नाकारलं नाहीस? आता का? आता माझं समाधान होईपर्यंत मी तुझा छळ करणार. तू माझं काय वाकडं करणार आहेस? तू काही मला शिक्षा करू शकणार नाहीस. मी राजाचा पंतप्रधान आहे. बाकी सर्व मंत्र्यांना मी नेमलेलं आहे. राजाचा सेनापती माझा मित्र आहे. खजिनदार माझा सासरा आणि मुख्य न्यायाधीश माझा मेव्हणा आहे, समजलं?"

राजूचे नोकर रघूला रस्त्यात फेकून देत असताना रघू म्हणाला, "तुमची सर्वांची

शंभर वर्षं भरलीच म्हणून समजा."

काही महिने लोटले. एक दिवस राजा बागेत एकटाच हिंडत असताना एक दाढीवाला नवखा माणूस त्याच्याजवळ आला. राजाला बऱ्याच वस्तू भेट म्हणून दिल्यानंतर तो दाढीवाला म्हणाला, "महाराज, दररोज मी आपल्याला अगदी गुप्तपणे पन्नास सोन्याच्या मोहरा देत जाईन. पण त्याच्या बदल्यात आपण दरबारात बसलेले असताना अगदी थोडा वेळ आपल्या कानात मला काय वाटेल ते कुजबुजायची परवानगी द्यावी."

"ठीक आहे. मला तर यात काही गैर दिसत नाही." राजा म्हणाला.

दुसऱ्या दिवशी राजा दरबारात बसला होता. त्याचे सगळे मंत्री आणि अधिकारी दरबारात हजर होते. तेवढ्यात हा अनोळखी माणूस वाट काढीत राजाजवळ गेला. राजाने हसून त्याचे स्वागत केले. आपले ओठ जवळजवळ राजाच्या कानाला चिकटवून तो म्हणाला,

"आज कसा छान दिवस उगवला आहे. सूर्य तळपतो आहे आणि आकाशात ढगांचा मागमूसही नाही."

पण हे कुजबुजत असताना तो वरचेवर राजूकडे पाहात होता. मग त्याने राजाच्या खिशात हळूच सोन्याच्या मोहरा सरकावल्या आणि तो निघून गेला.

पंतप्रधान राजू लगबगीने त्याच्या पाठोपाठ गेला. त्याला विचारू लागला. "महाराज, राजेसाहेबांपाशी तुम्ही काय बोलत होता? आणि बोलताना तुम्ही वरचेवर माझ्याकडे का पाहात होता?"

तो नवखा माणूस दुसरा कुणी नसून वेष पालटून आलेला रघूच होता. त्याने अगदी हेच घडेल असा तर्क केला होता.

रघू म्हणाला, "राजा आणि मी, आमचं दोघांचं ते रहस्य आहे. ते सांगा अशी तू मागणीच कशी करतोस?"

राजूची भीती जास्तच वाढली. नवख्याच्या पाया पडून त्याने त्याच्यापुढे शंभर सोन्याच्या मोहरा ठेवल्या. आणि गयावया करीत म्हणाला, "मी संध्याकाळी आपल्याला आणखी शंभर मोहरा देईन पण मला हे रहस्य काय ते सांगा."

रघु ताठ राहिला. पण राजूने आणखी [illegible] म्हणाला, "प्रसंग फार गंभीर आहे. तू लाचखाऊ आहेस अशी तक्रार पुष्कळ लोकांनी राजाकडे केली आहे. या आरोपाची चौकशी करण्याचं काम राजाने माझ्याकडे सोपवलं आहे."

"आणि महाराज, आपण आज महाराजांना याबाबत काय सांगितलंत?" राजूने उत्सुकतेने विचारले.

"मी राजाला सांगितलं की या बाबतीत मी चौकशी चालू ठेवली आहे." रघूने सांगितले.

"महाराज, माझ्यावर दया करा. मी आपल्याला एक हजार सोन्याच्या मोहरा देईन." राजूने वचन दिले.

"बरं आहे, बघतो मला तुमच्यासाठी काही करता आलं तर." रघू गंभीरपणे म्हणाला.



दुसऱ्या दिवशी पुन्हा रघू दरबारात राजाच्या कानात कुजबुजला, "आज पहाटे उत्तरेकडून वारा नुसता घोंघावत येत होता. आता तो ईशान्येकडून येत आहेसं दिसतं." पण हे सांगत असताना तो वरचेवर राजूकडे पाहात होता. राजाला त्या नवख्याच्या या निरर्थक बडबडीचे हसू आले; आपण याला आपल्या कानात असे कुजबुजू देतो आणि या सवलतीबद्दल रोज पन्नास सोन्याच्या मोहरा हा आपल्याला देतो. राजा खूष होता.



जाळ्यात सापडलेल्या माशाप्रमाणे राजू तडफडत होता. तो दरबार संपल्या-बरोबर रघूला भेटला. रघू त्याला म्हणाला "पंतप्रधानाने काहीही दुष्कृत्य केलं नसल्याबद्दल सध्या तरी राजाचं समाधान झालं आहे." राजूने त्याचे आभार मानले आणि त्याला एक हजार सोन्याच्या मोहरा दिल्या.

दुसऱ्या दिवशी रघू धुकं आणि पावसाची बुरबूर यासंबंधी राजाच्या कानात कुजबुजत होता. आणि वरचेवर सेनापतीकडे पाहात होता. सेनापतीला अगदी पंतप्रधानाप्रमाणेच वाटले. अर्थातच रघूला आणखी एक हजार सोन्याच्या मोहरा मिळाल्या. नंतर दर दिवशी त्याने एकेका मंत्र्याला असे घाबरून सोडले. मग खजिनदाराला आणि शेवटी मुख्य न्यायाधिशाला. त्यामुळे राजाला तो रोज पन्नास मोहरा देत असे पण त्याच्याजवळ दहा हजारांपेक्षाही जास्त मोहरा जमल्या.

मग एक दिवस दरबार भरला होता. मंत्री, अधिकारी आणि नागरिक या सर्वांची गर्दी झाली होती. अशा वेळी रघू राजाजवळ गेला आणि त्याच्या पुढ्यात उभा राहून म्हणाला, "महाराज, गेले कित्येक दिवस मी तुमच्या कानात निरर्थक काहीतरी कुजबुजलो. पण आज ही थैली काहीतरी अर्थपूर्ण गोष्ट सांगणार आहे." येवढे बोलून त्याने एक रेशमी थैली राजासमोर ओतली. घरंगळणाऱ्या त्या सोन्याच्या मोहरांचा किणकिणाट राजाला कानात कुणीतरी सुस्वर गुणगुणल्यासारखा वाटला. राजाला हसू आले. त्याला हा नवखा माणूस जरा विचित्रच वाटला. तो म्हणाला, "हे सगळं काय आहे. जरा समजावून सांगाल का?"

रघूने जी घडली होती ती सगळी हकीगत राजाला सांगितली. आणि मोहरांकडे बोट दाखवून म्हणाला, "महाराज, आपल्याला घेरून टाकणाऱ्या खोटेपणाचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे. आपले पंतप्रधान आणि इतर अधिकारी जर प्रामाणिक असते, सेनापतीने आपलं कर्तव्य चोखपणे बजावलं असतं, खजीनदार आणि न्यायाधीश लाचखाऊ नसते तर मी त्यांच्याकडे नुसतं बघितलं येवढ्यावरून ते भेदरून गेले नसते."

राजाच्या ताबडतोब लक्षात आले की आपले अधिकारी त्यांच्या अधिकारपदाला लायक नाहीत. ते लाचखाऊ आहेत. त्यांची मने साफ नाहीत आणि म्हणूनच त्यांना अपराधाची सतत बोचणी लागलेली आहे. ते भीतिग्रस्त आहेत. राजू आणि त्याचे मित्र या सर्वांनी खोटेपणाच्या आणि फसवणुकीच्या पायावर रचलेली त्यांच्या अधिकारपदाची इमारत त्या क्षणी तेथल्यातेथे कोसळली. राजाने रघूला आपला पंतप्रधान नेमले. आणि आता शहाणपण आलेल्या राजाच्या हाताखाली काम करण्यासाठी रिकाम्या झालेल्या अधिकारपदांवर त्याने लौकरच प्रामाणिक माणसे नेमली.





## अनोळखी देशाला भेट

फार पूर्वीची गोष्ट. एका देशात एक म्हातारा व्यापारी आणि त्याचा मुलगा अर्जुन दोघे राहात होते. एक दिवस व्यापारी मुलाला म्हणाला, "बेटा, हे दोन सुंदर अबलख घोडे बघ. मी त्यांना चांगलं पोसलं आहे. काळजीपूर्वक त्यांची मशागत केली आहे. ज्या देशात घोड्यांचं दुर्भिक्ष आहे तेथे या प्रत्येक घोड्याची किंमत निदान शंभर सोन्याच्या मोहरा तरी येईल. आता मी झालो आहे म्हातारा. इतक्या दूर प्रवास करणं मला शक्य नाही. पार दक्षिणेकडे एक देश आहे. त्या अनोळखी देशाचा इतका लांब प्रवास करण्याइतकं धैर्य तुझ्यात असेल तर तू हे घोडे घेऊन त्या दक्षिण देशात जा. तेथील राजा कदाचित यापेक्षाही जास्त किंमत देईल या घोडयांची."



आपल्याला अनोळखी देशाचा येवढा लांबचा प्रवास करायला मिळणार या कल्पनेनेच अर्जुनाच्या अंगात उत्साह संचरला. पण त्याच्या वडिलांनी बजावले, "लक्षात ठेव, पश्चिम दिशेला मुळीच जायचं नाही. जर का तू गेलास तर तुला एक बदमाशांचा देश लागेल. कुणीही परका मनुष्य आजवर तेथून छळ झाल्याशिवाय परत आलेला नाही. मी एकदा तेथे गेलो होतो. पण त्या माझ्या मूर्खपणाची मला जी जबर किंमत दयावी लागली ती मी जन्मात विसरलो नाही."

अर्जुन म्हणाला, "बाबा, त्या बदमाशांच्या देशात तुम्ही गेलात तेव्हा काय घडलं ते सांगा."

म्हातारा म्हणाला, "लहानपणी तुझ्या मोठ्या भावाबरोबर तू खेळायचास. आठवतं तुला? पंधरा वर्षांपूर्वी असाच मी व्यापाराला निघालो. खूप देश हिंडलो. तुझा मोठा भाऊ त्यावेळी चौदा वर्षांचा होता. त्यालाही मी बरोबर घेतलं होतं. मला वाटलं वेगवेगळे देश, तिथल्या लोकांची राहाणी हे सगळं त्याच्या डोळ्यांखालून गेलं तर तेवढंच तो काही शिकेल."

"आमच्या परतीच्या प्रवासात आम्ही दुर्दैवाने एका अनोळखी देशात गेलो. आम्ही तिथे पोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती म्हणून रात्र एका खाणावळीत काढली. तिथल्या माणसाचं बोलणं, वागणं पाहयल्यावर मी अंदाज बांधला की इतर बऱ्याच व्यापाऱ्यांनी मला ज्या देशाबद्दल सावध केलं होतं तोच हा बदमाशांचा देश असावा. म्हणूनच जितक्या लौकर तिथून निघता येईल तितकं निघायला मी अगदी उत्सुक होतो."

"दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्या खाणावळीच्या मालकाला पैसे देत असतानाच त्याचा भाऊ धावत धावत तेथे आला. तो रडत होता, आपल्या नशिबाला दोष देत होता. त्याच्या बायकोने एका मृतबालकाला जन्म दिला होता आणि त्याबद्दल तो मला दोष देत होता. माझ्या आश्चर्याला सीमाच राहिली नाही. तो बदमाश म्हणाला, "तू काल घोडयावरून उतरलास तेव्हा मोठमोठयाने श्वासोच्छ्वास करीत होतास. त्याच वेळी एक छोटासा किडा त्या खाणावळीच्या बाहेर उडून चालला होता. तुझ्या श्वासोच्छ्वासामुळे त्या हवेबरोबर त्याने आपली दिशा

बदलली. आणि माझी बायको ज्या खोलीत बसली होती तिथे तो किडा गेला. तो तिच्या नाकात शिरला. त्यामुळे तिला शिंक आली आणि म्हणून तिच्या पोटातलं मूल मेलं."

"या असल्या आचरट आरोपाला मी उत्तर देण्यापूर्वीच तिथे खूप मोठी गर्दी जमली. प्रत्येकजण त्या माणसाचीच बाजू घ्यायला लागला. त्यांनी माझ्या मुलाला माझ्यापासून खेचून घेतला, कारण त्या मेलेल्या मुलाच्या मरणाला मी कारण होतो हेच ती सगळी घोकीत होती. आता या क्षणापर्यंत माझा बिचारा मोठा मुलगा त्यांचा गुलाम म्हणून तिथे राबत असेल."

हा प्रसंग सांगत असताना म्हातारा रडत होता. अर्जुनाला आपल्या वडिलांचे दुःख पाहून फार वाईट वाटले. तो त्यांना धीर देत म्हणाला,

"बाबा, तुम्ही काही काळजी करू नका. मी बदमाशांच्या देशाच्या जवळपासही फिरकणार नाही."

अर्जुन ते दोन सुंदर घोडे घेऊन दक्षिण दिशेला निघाला. काही दिवसांनंतर तो एका नदीकाठी आला. नदीला पूर आला होता आणि ते घोडे आपल्या होडीत घेऊन जायला नावाडी मुळीच कबूल नव्हता. तो पुन्हा-पुन्हा सांगत होता, की पश्चिमेकडे गेलास तर तुला भक्कम नाव असलेला एखादा नावाडी भेटेल.





अर्जुन पश्चिमेकडे वळला. अचानक एक वादळ उठले. त्याने आश्रयासाठी चौफेर बघितले. पण काही दिसेना. तेवढ्यात त्याला जवळच्याच डोंगरापलीकडून धुराचा एक लोट येताना दिसला. दोन्ही घोड्यांचे लगाम हातात धरून मोठ्या कष्टाने तो डोंगर चढला.

वादळ नुकतेच ओसरले होते, अर्जुनाला दिसले की डोंगराच्या पायथ्याशी एक गाव आहे. तो आता पश्चिमेकडे खूप दूरपर्यंत आला होता तेव्हा त्याच्या मनात आले की हे गाव त्या बदमाशांच्या देशातलेच असावे. परत फिरण्याचा त्याने निश्चय केला. पण त्याचे कुतूहल त्याला स्वस्थ बसू देईना. या गाजलेल्या देशात कशा प्रकारचे लोक असतील? तो डोंगराच्या कडेवरून थोडा वाकून पाहू लागला, पण एका हालत्या कड्यावरून त्याचा पाय निसटला आणि तो डोंगरावरून घसरत, डोक्याकडून



आद्ळत ठेचकळत त्या गावात येऊन आपटला. त्याचे घोडेही दाडत त्याच्याजवळ येऊन उभे राहिले.

तेथून जात असलेला एक म्हातारा धावत त्याच्याकडे आला. अर्जुन उठून उभा राहिला. सुदैवाने त्याला फार लागले नव्हते. उलट तो म्हातारा आपल्याकडे इतका बारकाईने पाहातो आहे याची त्याला गंमतच वाटत होती. तो स्वतःशीच म्हणाला, "म्हणजे या बदमाशांच्या देशातसुद्धा दुसऱ्याकडे लक्ष देणारी माणसं आहेत म्हणायची."





अर्जुन त्या म्हाताऱ्याचे आभार मानणार तेवढ्यात म्हातारा गळा काढून रडू लागला. अर्जुनाच्या अंगाखाली एक बेडूक चिरडला होता. तो मोठमोठ्याने रडत आक्रोश करू लागला, "माझ्या लाडक्या, छोट्या बेडका, माझ्या पोरा, तुझ्या मरणाचा मी कसा सूड घेऊ बरं?" तो रडत असतानाच तेथे खूप गावकरी जमले. ते त्या म्हाताऱ्याशी कुठल्यातरी विचित्र भाषेत बोलले. नंतर अर्जुनाकडे वळून म्हणाले, की त्या म्हाताऱ्याला मूल नव्हते म्हणून त्याने या बेडकाला पाळले होते. हा पाळीव बेडूक आपल्या कामाबद्दल आणि बापावरच्या प्रेमाबद्दल फार प्रसिद्ध होता. या देशातल्या ह्या विलक्षण बेडकाच्या मरणाने त्या म्हाताऱ्याला दुःख झाले आणि एकटेपणा वाटू लागला तर त्यात नवल नाही.

लवकरच बरेचसे गावकरी त्या म्हाताऱ्याच्या रडण्यात सामील झाले. काय करावे ते अर्जुनाला कळेना. ताबडतोब तेथून निघून जावेसे त्याला वाटले. म्हाताऱ्याचे कशाने समाधान होईल म्हणून त्याने लोकांना विचारले.

म्हातारा एकदम म्हणाला, "तुझा एक घोडा मला दे." "काय? एका बेडकाच्या बदली घोडा? अर्जुन रागावून म्हणाला.

म्हातारा म्हणाला, "अरे पोरा, तुझं आश्चर्यच वाटतं मला. अरे घोड्याची किंमत मुलापेक्षा कधी जास्त होईल का?"



सरतेशेवटी आमच्या या तरुण व्यापाऱ्याला एका बेडकाच्या बदल्यात आपला एक सुंदर घोडा त्या बदमाशाला दयावा लागला. मोठ्या जड अंतःकरणाने त्याने ते गाव सोडले. पण आता पुन्हा डोंगर चढून जाणे कठीण असल्यामुळे तो थोडे अंतर चालून गेला. दुसऱ्या बाजूने एखादा रस्ता मिळतो का ते तो शोधीत होता.

लवकरच तो डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या दुसऱ्या गावात आला. त्याला भूक लागली होती. तहानेने घसा सुकला होता. अगदी जवळच्याच एका घरापाशी जाऊन त्याने दार ठोकले. एका एकडोळ्या माणसाने दार उघडले. अर्जुनाने त्याच्याकडे प्यायला पाणी आणि खायला काहीतरी मागितले.

तो एकडोळ्या म्हणाला, "मी तुला खायला काही देऊ शकत नाही पण प्यायला मात्र पोटभर पाणी देतो. कुठूनतरी पोट भरल्याशी कारण. होय की नाही ?"

अर्जुन पाणी प्यायला. त्याने त्याचे आभार मानले. तो आता तेथून जायला निघणार तेवढयात एकडोळयाने विचारले. "तू कुठून आलास ? तुझ्या बापाचं नाव काय ?" अर्जुन याचे उत्तर देतो न देतो तोच एकडोळयाने त्याचा दंड पकडून म्हटले, "बरा सापडलास एकदाचा. नीट लक्ष देऊन ऐक पोरा, वीस वर्षांपूर्वी मी तुझ्या देशात व्यापारासाठी गेलो होतो. दुर्दैवाने माझे सगळे पैसे चोरीला गेले. तुझ्या बापाला मी चांगला ओळखत होतो. मी त्याच्याकडे दोन मोहरा कर्जाऊ मागितल्या. पण काहीतरी वस्तू गहाण ठेवल्याशिवाय तो ते देईना, माझ्याजवळ तर त्याला दयायला काही नव्हतं. तेव्हा तो म्हणाला, "तुझा एक डोळा काढून ठेव." मला पैशाची इतकी गरज होती की मी तुझ्या बापाला माझा एक डोळा काढून दिला. आणि त्यावर वीस वर्षे लोटली. तुझ्या बापाने वर्षभरानंतर इकडे येऊन माझा डोळा परत करण्याचं वचन दिलं होतं. पण आता तू मला सापडलास. माझा डोळा मला परत दे. आपल्या बापाचं कर्ज फेडणं मुलाचं कर्तव्यच आहे. तुझ्या बापाकडून मी घेतलेल्या दोन मोहरा आणि व्याजादाखल आणखी एक मोहोर दयायला मी तयार आहे."



लवकरच एकडोळ्याची बाजू घेणारी कितीतरी माणसे तेथे जमली. अर्जुन अगदी रडकुंडीला येऊन म्हणाला "मला तुमच्या डोळयाबद्दल काहीच ठाऊक नाही. मी काय करू ते सांगा आणि मला जाऊ दया."

"तू जाऊ शकतोस." तो एकडोळया म्हणाला, "पण तुझ्या घोडयाशिवाय."

अर्जुनाला आपला घोडा तेथेच ठेवून पायी चालण्याशिवाय दुसरा इलाजच नव्हता. डोंगरावरून कोसळल्यामुळे त्याचे आंग दुखत होते आणि दोन बहुमोल घोडे गेल्यामुळे त्याचे हृदय दुखावले होते. पोटात भुकेने कावळे कोकलत होते ते त्याला पुढे पाऊल टाकू देत नव्हते. तो एका झाडाखाली बसला. त्याला रडू कोसळले.

तेथून जाणारा एक तरुण थांबून त्याला विचारू लागला "कोणरे तू? आणि रडतोस का ?" पण अर्जुनाने काहीच उत्तर दिले नाही. आता या देशातल्या कोणत्याही माणसाजवळ बोलायची त्याला भीती वाटत होती. पण तो माणूस त्याला सारखा बोलण्याचा आग्रह करीत होता. तो प्रेमळही वाटत होता. तेव्हा अर्जुनाने आपले दोन्ही घोडे कसे गमावले त्याची हकीकत थोडक्यात सांगितली. तो माणूस थोडा वेळ गप्प राहिला आणि मग म्हणाला, "आपण राजाकडे जाऊ या. तुझे घोडे परत मिळवून देण्याचं माझ्याकडे लागलं."

प्रथम अर्जुन तयार होईना. पण आता गमावण्यासारखे काही उरलेही नव्हते तेव्हा तो त्या माणसाबरोबर राजवाडयात गेला. जाताना वाटेत राजाला काय सांगायचे ते त्या माणसाने अर्जुनाला शिकवले.



अर्जुनाची तक्रार ऐकून घेतल्यावर राजाने त्या म्हाताऱ्याला आणि एकडोळ्याला दरबारात हजर व्हायला सांगितले; खटला सुरू झाला. त्या म्हाताऱ्या माणसाने मेलेला बेडूक आपला पाळलेला मुलगा होता असे जाहीर केल्यावर अर्जुनाने आपल्या पागोट्यातून एक जिवंत बेडूक बाहेर काढला. आणि राजाकडे वळून म्हणाला, "महाराज, मी नुकताच हा बेडूक पाळला आहे. मी याला डोंगराच्या पायथ्याशी ठेवतो. या म्हाताऱ्याला डोंगरावरून आदळत ठेचकळत खाली येऊन या माझ्या पाळीव बेडूक पुत्रावर आदळून त्याला मारून टाकू दे."

राजाने ते मान्य केले "हे अगदी योग्य आहे. ही मागणी शहाणपणाची आहे हे कुणीच अमान्य करणार नाही. म्हाताऱ्याचा प्रश्न सोडवायला हाच खरा मार्ग आहे."

म्हातारा अर्थातच याला मुळीच कबूल होईना. अर्जुनाचा घोडा परत करून तो निघून गेला.

आता आपली तक्रार मांडण्याची पाळी आली एकडोळ्याची. स्वतःच्या बचावाखातर अर्जुन म्हणाला,

"महाराज, माझ्या बाबांना खरंच एकेक विलक्षण छंद होते. त्यातला एक म्हणजे लोकांचे डोळे गोळा करणं. खरं पाहता आमच्या संग्रहालयात असे शेकडो डोळे आहेत. या गृहस्थाचा डोळा परत दयायला मी तयार आहे. पण याचा सध्याचा डोळा घेऊन गेल्याखेरीज त्याच्या जोडीचा डोळा मी कसा काय शोधणार! तेव्हा मी याचा हा दुसरा डोळाही काढून माझ्याबरोबर घेऊन जातो. लवकर मी याचे दोन्ही डोळे जसेच्या तसे परत करीन."

"अगदी बरोबर." राजा म्हणाला. आता एकडोळ्याने मुकाट्याने घोडा परत केला आणि आपला दुसरा डोळा परत मिळविण्याबाबत जरादेखील उत्सुकता दाखविली नाही हे काय सांगायला पाहिजे?



मग अर्जुनाला राजाकडे घेऊन येणारा माणूस म्हणाला, "या देशाच्या सीमेपर्यंत मी तुला सोबत करतो. म्हणजे आणखी कुणी तुला छळणार नाही." ते चालता चालता गप्पा मारीत असताना अर्जुनाला समजून चुकले की हा माणूस दुसरा तिसरा कोणी नसून आपला हरवलेला भाऊच आहे. ज्या बदमाशाने आणि त्याच्या बायकोने त्याला गुलाम म्हणून आपल्याकडे ठेवले होते ती दोघे नुकतीच मेली होती. तेव्हापासून आपल्या देशात परत जाण्याची तो संधी शोधीत होता. या लोकांच्या युक्त्या माहीत असल्याने त्यांना कसे तोंड दयावे ते त्याला चांगले माहीत होते.

दोघाही भावांनी बदमाशांचा देश सोडला. ते दक्षिणेकडे गेले. आपले घोडे त्यांनी खूप किमतीला विकले. आणि दोघे घरी परतले. ते दोघे भेटले तेव्हा त्यांच्या बापाला वाटले, जगात माझ्याइतका सुखी कुणी नाही.





## राजाचे स्वर्गारोहण

एक लठ्ठंभारती मूर्ख राजा होता. त्याचा प्रधान होता काटकुळा पण हजरजबाबी. प्रधान स्वतःला अति शहाणा समजे आणि रात्रंदिवस राजाची स्तुती करीत राही. राजाला वाटे हा शहाणा प्रधान जोपर्यंत आपल्याजवळ आहे तोपर्यंत आपल्याला काही चिंता नाही.

राजा नेहमी प्रधानाला म्हणे, "मला सोडून जाणार नाहीस असं वचन दे." आणि त्यावर प्रधान नेहमीच उत्तर देई, "नाही महाराज, कधीच नाही. आपण जेथे कुठे असाल, या पृथ्वीवर, स्वर्गात अगर नरकात....मी सतत आपल्यापाशी राहीन. आपल्याला योग्य सल्ला देत जाईन आणि जगातले सगळे प्रश्न आपल्यासाठी मी सोडवून देईन." राजा या उत्तराने फार खूष होई.

एक दिवस संध्याकाळी नदीकाठचा फेरफटका उरकून राजा राजवाड्याकडे परत येत होता. अचानक त्याला शेजारच्या रानातून कोल्ह्यांची कोल्हेकुई ऐकू आली. राजाला कुतूहल वाटले. या कोल्हेकुईचे कारण त्याला समजून घ्यायचे होते.



तो आपल्या प्रधानाकडे वळून म्हणाला, "हे इतके कोल्हे एकाएकी एकाचवेळी का ओरडताहेत? आणि ते देखील माझ्यासारख्या राजाला ऐकू जाईल असं?"

प्रधानजी उत्तरले, "महाराज, आपल्याला माहीतच आहे यंदाचा हिवाळा जास्तच कडक आहे. या बिचाऱ्या कोल्ह्यांजवळ उबदार कपडे नाहीत. ते आपल्याकडे पांघरुणाची याचना करताहेत."

"असं म्हणता? चांगलं सांगितलंत. कोल्ह्यांच्यासुद्धा भावना समजतात तोच खरा शहाणा प्रधान. पण या कोल्ह्यांजवळ पांघरुणं का नाहीत?" राजाने विचारले.

"आपले कल्याणाधिकारी याला जबाबदार आहेत." प्रधान म्हणाला. त्या अधिकाऱ्यावर प्रधानाचा रोष होता.

"बापरे. आपल्या कल्याणाधिकाऱ्याने या कोल्ह्यांना पांघरुणं दिली नाहीत म्हणता? ठीक आहे. त्या अधिकाऱ्याला एका पांघरुणात गुंडाळा आणि समुद्रात फेकून द्या. मग शंभर एक पांघरुणं विकत घ्या आणि माझ्या या कोल्हेमित्रांना वाटून टाका." राजाने हुकूम सोडला.

घाईघाईचे नाटक करीत प्रधानजी राजाचा हुकूम पाळायला निघाले. पण त्याने हुकमाचा पहिला अर्धा भाग पाळला. त्याने त्या अधिकाऱ्याला समुद्रात बुडवले, पण राजाच्या तिजोरीतून पांघरुणे विकत आणायला त्याने पैसे घेतले तरी पांघरुणे मात्र कधीच विकत आणली नाहीत.



दुसऱ्या दिवशी संध्याकाळी राजाला पुन्हा कोल्हेकुई ऐकू आली. तो आपल्या प्रधानाकडे आश्चर्याने पाहात म्हणाला, "आता या कोल्ह्यांना पुन्हा ओरडायला काय झालं आज?"

"आजचं कारण कालच्यापेक्षा फारच वेगळं आहे महाराज. आज ते आपले आभार मानण्यासाठी ओरडताहेत." प्रधान हसून म्हणाला.

"आश्चर्यच आहे." राजा म्हणाला, "माझ्या डोक्यातच आलं नाही हे. माझ्या प्रधानासारखा प्रधान कोणत्याच राजाजवळ नसेल. माझी खात्री आहे. माझ्या श्रेष्ठ प्रधाना, तू माझ्याजवळ आहेस म्हणजे सगळ्या जगातली विद्वत्ता माझ्या बोटांवर नाचते आहे. प्रधानजी, मला कधीही सोडून जाणार नाही असं वचन द्या."

"कधीच नाही." प्रधानाने वचन दिले. आपण स्वर्गात असा की नरकात, मी सतत आपल्याबरोबर राहीन."

राजा फारच खूष झाला. पण त्याचा हा आनंद फार काळ टिकला नाही. अचानक एक छोटेसे रानडुक्कर समोरून धावत गेले. राजा आपले लहान शहर सोडून कधीच जंगलात शिकारीला गेला नव्हता आणि त्याने रानडुक्करही कधी पाहिले नव्हते. तेव्हा मोठ्या आश्चर्याने त्याने प्रधानाला विचारले, "बापरे, हा कोणता प्राणी?"





प्रधानाने कित्येकदा रानडुक्करे पाहिली होती. पण नेहमीप्रमाणेच राजाच्या अज्ञानाचा फायदा घ्यायचे त्याने ठरवले. म्हणून तो म्हणाला, "महाराज, हा आपला एक हत्ती आहे. याची ही अशी अवस्था का झाली माहीत आहे? हत्तीची व्यवस्था पाहाणाऱ्या अधिकाऱ्याने त्याला पोटभर खायला दिलेलं नाही."

राजा भयंकर संतापला. त्या अधिकाऱ्याला ताबडतोब ठार मारण्याचा त्याने हुकूम दिला. मग त्याने प्रधानाला सांगितले, "माझ्या तिजोरीतून हवा तेवढा पैसा घ्या प्रधानजी, पण या प्राण्याची प्रकृती पुन्हा पहिल्यासारखी सुधारा."

प्रधानजींनी तिजोरीतून खूप मोठी रक्कम उपसली पण ती स्वत:जवळच ठेवली हे काय सांगायला हवे?

यानंतर एक महिना लोटला. एका संध्याकाळी राजा हिंडूनफिरून परत येत असताना पुन्हा त्याला ते रानडुक्कर दिसले. त्याने प्रश्नार्थक मुद्रेने प्रधानाकडे बघून विचारले, "आपल्याला त्या दिवशी दिसला तोच हा उपाशी हत्ती ना? अजून त्याची प्रकृती सुधारली कशी नाही?"



प्रधानाने आपल्या अक्कलदाढा दिसतील एवढा जबडा वासून म्हटले, "नाही महाराज. तो हत्ती आपल्यासारखाच गरगरीत झाला आहे आता. हा प्राणी आहे एक उंदीर आणि राजवाडयातल्या सैपाकघरातल्या अन्नावर पोसल्यामुळे हा इतका फुगला आहे. आपला मुख्य सैपाकी किती निष्काळजी आहे हे स्पष्टच दिसतं आहे."

लठ्ठंभारती राजाचा गुबगुबीत चेहरा पिकल्यामिरचीसारखा लालबुंद झाला. डोळे गरागरा फिरवीत तो ओरडला, "अरेरे, माझी तब्बेत असायला हवी ती या उंदराची झाली आहे. आणि हे का तर त्या सैपाक्याच्या निष्काळजीपणामुळे!"


त्याने ताबडतोब हुकूम दिला, "माझं जेवण तयार झाल्याबरोबर त्या सैपाक्याला फाशी दया."

त्या संध्याकाळी तो सैपाकी प्रधानाला चोरून भेटला आणि त्याने त्याला पुष्कळ पैसे दिले. शिवाय कबूल केले की ज्या ज्या वेळी आपण राजासाठी एखादे पक्वान्न बनवू तेव्हा त्यातले थोडे प्रधानाकडे पाठवू.

प्रधानाला फार आनंद झाला. त्याने सैपाक्याला आश्वासन दिले, "हे बघ, तुला कांहीही होणार नाही याची मी खबरदारी घेईन. तू मुळीच काळजी करू नकोस."

मध्यरात्री, राजादेखत त्या सैपाक्याला फाशी देणार तेवढयात प्रधान तेथे ओरडत आला. "थांबा, कृपा करून थांबा."





मग राजाकडे वळून तो म्हणाला, "महाराज, मी आत्ताच पंचागात बघितलं, आणि मला आढळलं की ही मध्यरात्रीची वेळ फारच शुभ आहे. या वेळेला जो कोणी फाशी जाईल त्याला स्वर्गातलं स्थान राखून ठेवलेलं मिळेल. महाराज, या सैपाक्याला यावेळी फाशी देणं ही त्याला मुळीच शिक्षा होणार नाही. उलट ते बक्षीसच होईल. आपल्याऐवजी ज्या गुन्हेगाराने एका उंदराला लठ्ठ केलं त्याला आपण स्वर्गात काय म्हणून पाठवायचं?"


प्रधानाला खात्री होती की काहीतरी कारण काढून ही फाशी लांबवली की नंतर राजा सगळे विसरून जाईल. कारण त्याची स्मरणशक्ती चाळणीसारखी.

पण राजा आनंदातिशयाने म्हणाला, "वाः वाः फारच छान. कित्येक दिवसापासून मला स्वर्ग कसा आहे ते पाहायची इच्छा होती." आणि मग फाशी देणाराकडे वळून तो म्हणाला, "तो फास माझ्या गळयात अडकव आणि झटकन मला फाशी दे पाहू."

पण राजा फाशीच्या दोराकडे जाता जाता एकदम मध्येच थांबला आणि प्रधानाकडे वळून म्हणाला, "प्रधानजी, मला कधीही सोडून न जाण्याचं वचन आता तुम्ही पाळलं पाहिजे. चला मला स्वर्गाचा रस्ता दाखवा."

राजाने आधी प्रधानाला फासावर चढविण्याचा हुकूम दिला. भेदरलेल्या प्रधानाच्या तोंडून शब्द उमटण्यापूर्वीच फाशी देणाऱ्या माणसाने त्याला फासाकडे ओढून आणला आणि दरबारी मंडळींनी दोर त्याच्या मानेभोवती आवळला. आपल्या हुकमाची अंमलबजावणी ते इतक्या तत्परतेने करीत आहेत हे पाहून राजा खूष झाला.

प्रधानाला फाशी दिल्याबरोबर लगेच राजाच्या इच्छेप्रमाणे त्यांनी त्यालाही फासावर लटकावले!





## सर्वश्रेष्ठ वरदान

अंधारी रात्र. पावसाळयाचे दिवस. एका अरुंद गल्लीतून राजा घोडयावरून रपेट करीत चालला होता. त्याच्या पद्धतीप्रमाणे तो वेष पालटून हिंडत होता. एखादया सामान्य माणसासारखा पोशाख करायचा आणि प्रजाजन कसे काय राहतात ते बघायचे अशी त्याला सवय होती.

पावसाने तो चिंब भिजला. पण त्याला त्याचे काहीच वाटले नाही. एवढा गारठा सहन करण्याइतका तो सशक्त होता. अंधाराचीही त्याला पर्वा नव्हती कारण कोणत्याही संकटाला तोंड दयायला तो भीत नसे. त्यामुळे तो अगदी मजेत पण अर्थातच सावधगिरी बाळगून चालला होता. राजाच्या मागून लपत छपत काही डाकू येत होते. राजा फार सुंदर घोडयावर बसून जात आहे हे त्यांनी बघितले होते. आणि तो घोडा चोरण्याचा त्यांचा बेत होता.



अचानक त्या डाकूंनी राजाला घेरले. राजाला आश्चर्य वाटले पण तो मुळीच भ्याला नाही. तो निसटून जाण्याच्या बेतात होता तेवढ्यात रस्त्यावरच्या एका फटीत त्याच्या घोड्याचा खूर अडकला. डाकू होते डझनापेक्षा जास्त, ते राजावर तुटून पडणार होते, पण तेवढयात सहा माणसे धावून आली राजाच्या सुटकेसाठी. त्यांनी डाकूंवर मागच्या बाजूने हल्ला केला. या अचानक झालेल्या हल्ल्याला तोंड दयावे लागल्यामुळे ते डाकू राजाला काही दुखापत करू शकले नाहीत.



राजा जेव्हा असा वेष पालटून हिंडत असे तेव्हा त्याचे काही बलदंड शरीररक्षक थोडया अंतरावर त्याच्या मागून येत असत. ते आता तेथे येऊन पोहोचले. लौकरच डाकूंना पकडण्यात आले. त्यांनी निसटून जायचा प्रयत्न केला पण तो फसला. राजाच्या शरीररक्षकांनी त्यांना सहज पकडले.

आपल्या रक्षणासाठी धावून आलेल्या त्या सहा तरुणांवर राजा फार खूष झाला होता. अर्थातच आपण आपल्या राजाची फार मोठी सेवा करीत आहोत याची त्यांना कल्पनाही नव्हती. राजाने त्यांना बरोबर घेतले आणि आपल्याबरोबर राजवाडयात चलण्याचा आग्रह धरला.

ते तरुण वेगवेगळया गावांतून आलेले होते पण एकाच खाणावळीत राहात असल्याने एकमेकांचे मित्र बनले होते.

सकाळ होताच आदल्या रात्री घडलेल्या प्रसंगाची वार्ता सगळयाभर पसरली. आपल्या थोर राजाला त्या डाकूंनी काही दुखापत केली नाही याचा प्रत्येकाला फार आनंद झाला होता. राजाचे कुटुंबीय, मंत्री, दरबारी आणि प्रजाजन सर्वांनी त्या तरुणांच्या धैर्याबद्दल त्यांची प्रशंसा केली.

राजा दरबारात आला तेव्हा त्या सहा तरुणांनाही दरबारात बोलावण्यात आले. राजा सिंहासनावरून उतरून खाली आला आणि त्याने त्यांना मिठी मारली आणि त्यांनी केलेल्या मदतीबद्दल त्यांना बक्षीस देण्याची आपली इच्छा प्रकट करून राजा म्हणाला,

"तुमच्यापैकी प्रत्येकाने स्वतःला अत्यंत आवडती अशी एखादी गोष्ट मागावी. मी ती तत्क्षणी देण्याचं वचन देतो. अर्थातच ते देणं माझी सत्ता आणि शक्ती यांच्या पलीकडचं मात्र असता कामा नये."

त्या सहा मित्रांपैकी सर्वांत मोठयाला प्रथम आपली इच्छा सांगण्याचा राजाने आग्रह केला. क्षणभर विचार करून तो म्हणाला, "हे श्रेष्ठ राजाधिराज, कित्येक दिवसांपासून एखादया आरामशीर घरात राहण्याची माझी इच्छा आहे. माझी ही इच्छा आपण पूर्ण कराल का?"

राजाने ताबडतोब शाही शिल्प कारागिराला बोलावणे पाठवले आणि या

तरुणासाठी आलीशान इमारत बांधून दयायला फर्मावले.

दुसऱ्या तरुणाला सरदारकी मिळावी अशी इच्छा होती. राजाने त्याला काही पदव्या बहाल केल्या आणि आपला एक खास उमराव म्हणून नेमणूक केली.



तिसरा तरुण म्हणाला, "महाराज, माझ्या गावातले लोक रोज खेडयातून शहरात भाजी विकण्यासाठी येतात. माझ्या गावापासून शहरापर्यंत येण्यासाठी चांगला रस्ता नसल्यामुळे या लोकांना फार त्रास होतो. विशेषतः पावसाळ्यात तर फारच. माझी आपल्याला अशी विनंती आहे की या खेडूतांसाठी आपण चांगला रस्ता बांधून दयावा.'

राजाने संमती दर्शविली आणि रस्ता आणि पूल बांधणी मंत्र्याने ही मागणी नोंदून घेतली.



चौथ्या तरुणाला त्याची इच्छा विचारताच तो लाजला आणि म्हणाला, "महाराज, आपण मला वडिलांसारखे–तेव्हा कृपा करून माझ्यासाठी एखादी सुंदर बायको शोधा. "राजाने आपल्या खुषमस्कऱ्याला सांगितले, तुझी मुलगी याला दे." खुषमस्कऱ्या या लग्नाला आनंदाने कबूल झाला.

पाचव्या तरुणाने पैसे मागितले. ताबडतोब सोन्याने भरलेल्या थैल्या त्याला देण्यात आल्या.

सरतेशेवटी सहाव्या तरुणाची पाळी आली. तो म्हणाला, "महाराज, आपल्यापैकी कुणीतरी एक मरेपर्यंत वर्षातून एकदा आपण माझ्या घरी पाहुणे म्हणून यावं!"

त्या तरुणाची ही विचित्र इच्छा ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले. पुष्कळांनी त्याला मूर्ख ठरवले. राजालासुद्धा ती मागणी विचित्रच वाटली. पण आपल्या सत्तेच्या आणि शक्तीच्या मर्यादेतील कोणतीही इच्छा पुरवण्याचे त्याने वचन दिले होते. अर्थातच त्याने वर्षातून एक दिवस आणि एक रात्र त्या तरुणाकडे घालविण्याचे कबूल केले.

आता राजाच्या या वार्षिक भेटीची योग्य ती व्यवस्था करण्याचे काम राज्यातल्या विविध खात्यांकडे सुपूर्द करण्यात आले.

सर्वात आधी त्या तरुणाच्या गावापर्यंत चांगला शाही रस्त्या बनवण्याचे काम

आले. कारण राजाचा रथ तर गचके न बसता रस्त्यावरून सरळ चालला पाहिजे. मग प्रश्न आला, "वर्षानुवर्ष – दरवर्षी राजा एखादया झोपडीत कसा झोपेल? तेव्हा राजाच्या योग्य असा आलीशान राजवाडा बांधण्यात आला. पण तो तरुण आपल्या क्षुल्लक मिळकतीतून या सगळ्या राजवाड्याची व्यवस्था कशी ठेवणार? अर्थातच ही अडचण दूर करण्यासाठी त्याला सोने भरलेल्या थैल्या आणि वार्षिक तनखा देण्यात आला.

बरं, पूर्वापार परंपरा अशी होती की राजा फक्त एखादया उमरावाचाच पाहुणा म्हणून जाऊ शकतो. म्हणून मग त्या तरुणाला काही खास पदव्या बहाल करण्यात येऊन उमरावाचे उच्चपद देण्यात आले आणि राजघराण्यातल्या एखादया राजपुत्राप्रमाणे त्याचा मान आणि आदर ठेवला जाऊ लागला. पण अजून एक मुद्दा राहिलाच. राजाची यजमानीण म्हणून जी स्त्री राहणार तिला राजाच्या सवयी आणि आवडीनिवडी यांचे ज्ञान हवे आणि हे राजकन्येशिवाय कुणाला समजणार आणि माहीत असणार? ताबडतोब राजकन्येचे या तरुणाशी लग्न लावून देण्याची जय्यत तयारी सुरू झाली.

अशा तऱ्हेने फक्त एकच वरदान मागूनसुद्धा आपल्या पाचही मित्रांनी जे मिळवले तवढेच नव्हे तर त्याहीपेक्षा या तरुणाने पुष्कळच जास्त मिळवले.





## तोंडी व्यवहार

संध्याकाळची वेळ होती. एका गावातून एक म्हातारा चालला होता. एका छोटयाशा घरातून त्याला गाण्याचा मधुर सुस्वर ऐकू आला. गाणे संपेपर्यंत तो बाहेर रस्त्यावर थांबला. त्यानंतर तो घराजवळ गेला आणि आत डोकावून पाहू लागला. ती गाणे गाणारी होती एक लहान मुलगी. त्याने मोठ्या मायेने तिला थोपटले आणि एक सोन्याची मोहोर दिली.

त्या मुलीचा बाप मोहन शेजारीच उभा होता. या अकल्पित बक्षिशीने त्याला फार आनंद वाटला. त्याने आपल्या मुलीच्या हातून ती मोहोर हिसकावून घेतली. म्हातारा परत जायला निघाल्याबरोबर मोहन ओरडला. "थांबा, माझ्या बाकीच्या पैशांचं काय?"

म्हाताऱ्याने मोठ्या आश्चर्याने मोहनकडे बघितले. मोहन पुढे म्हणाला, "हे पाहा, म्हातारेबोवा, माझ्या मुलीचं गाणं ऐकण्याच्या आनंदाची किंमत फक्त एक मोहोर नाही. दहा मोहोरा आहे. तेव्हा उरलेल्या मोहरा लौकर दया. जितक्या झटपट दयाल तितकं बरं."

म्हाताऱ्याच्या ताबडतोब लक्षात आले की मोहन लुच्चा माणूस आहे. पण आपल्याला काही समजले नाही असे वेड पांघरून तो म्हणाला, "छोटया गायिकेच्या माननीय बापा, आता या क्षणी माझ्याजवळ आणखी मोहोरा नाहीत. मला फार वाईट वाटतं, पण काय करू?"

"मग तुम्ही मला तुमची टोपी, सोन्याची साखळी आणि जोडे दया." मोहन म्हणाला.

"इतका शहाणपणा ज्यात भरला आहे त्या तुझ्या डोक्यावर टोपी खरंच हवी. तसंच ते डोकं तोलून धरणाऱ्या मानेभोवती साखळीही पाहिजेच. पण माझ्या मित्रा, या वस्तू फार जुन्या आहेत. त्यांची काय किंमत येणार? त्यापेक्षा तू माझ्याबरोबर माझ्या घरी चल. मी तुला शंभर सोन्याच्या नव्याकोऱ्या मोहोरा मोठ्या आनंदाने देईन. तुला आता मी दिली ती मोहोर तितकीशी चांगली नाही. तू माझ्याबरोबर यायचं ठरवलंस तर ती मोहोर परत दे."

"शंभर सोन्याच्या मोहोरा? तुम्ही खरंच फार चांगले आहात. तुमचं घर किती दूर आहे? अर्थात शंभर सोन्याच्या मोहोरांसाठी मी हजार मैल चालायला तयार आहे." मोहन मोठ्या खुषीत म्हणाला.

"त्याची काही गरज नाही. तुम्हांला फक्त तीन मैल चालावं लागेल." म्हातार म्हणाला.

मोहनने म्हाताऱ्याकडून मिळालेली मोहोर त्याला परत दिली. मग तो शंभर मोहोरा मिळविण्यासाठी म्हाताऱ्याच्या मागोमाग निघाला.

चालता चालता मोहन मोठ्या खुषीत आला होता. तो आनंदाने जणू बेहोष होईल असे वाटत होते.

"या शंभर मोहोरांचं मी काय करीन माहीत आहे?" त्याने विचारले.

"नाही बुवा." म्हातारा म्हणाला.

"मी असा एक सुंदर किल्ला बांधीन की त्याच्या भव्यतेपुढे राजाचा राजवाडाही फिक्का पडेल."

"असं म्हणता?"



"आणि मी राजाच्या मुलीला लग्नाची मागणी घालीन."

"पण तुमचं आधीच लग्न झालेलं आहे आणि तुम्हांला एक मुलगीपण आहे."

"म्हणून काय झालं? मी पुन्हा लग्न करीन, आणि यावेळी राजकन्येशीच; दुसऱ्यां कुणाशी नाही."

"अस्सं अस्सं, समजलं."

नौकरच ते शहरात पोचले आणि आले थेट राजाच्या राजवाडयासमोर. म्हाताऱ्याला राजवाडयाच्या प्रवेशद्वाराकडे जाताना पाहून मोहनने विचारले. "तुम्ही तिकडे कशाला जाता आहात?"

"म्हणजे काय? ते माझं घर आहे." म्हातारा म्हणाला.

मोहनने म्हाताऱ्याकडे लक्षपूर्वक बघितले. त्याने एकदम त्याला ओळखले. तो खरेच राजा होता. पण त्याने वेष पालटलेला असल्याने मोहनने आधी त्याला ओळखले नाही. मोहनची वाचाच बसली. राजा मोठ्या नम्रपणे म्हणाला, "छोटया गायिकेच्या थोर बापा, आता तू जाऊ शकतोस, तुझ्या मुलीच्या गाण्यानं मला पाच मिनिटं आनंद दिला. त्याच्या बदल्यात मी तुला सबंध तासभर शंभर मोहोरांच्या वचनाचा आनंद नाही का दिला? मुलीच्या तोंडच्या कलेनं मला आनंद दिला. माझ्या तोंडी वचनाने तुला आनंद दिला. परतफेड बरोबर झाली की नाही? पुढे ऐक. तू जी पैशाबद्दलची हाव दाखवलीस त्यामुळे माझ्या आनंदावर निराशेची छाया पसरली. अर्थातच हा व्यवहार जास्त न्यायाचा करण्यासाठी मी ठरवलं की तुझ्या आनंदानंतर तुझ्याही पदरी निराशाच यावी. जा, आता चालता हो."

मोहन आपल्या गावी परत आला. आपण मिळविलेल्या आणि नंतर घालविलेल्या एका मोहोरेबद्दल त्याला फार दुःख होत होते.





## मूषकी नवरा निवडते

शरयू नदीच्या किनारी एक साधू आपल्या बायकोसह राहात असे. ती दोघे लहानशा झोपडीत राहात. साधे कपडे वापरीत आणि आसपासच्या गावातले लोक जे काही देत त्यावर आपला उदरनिर्वाह करीत.





त्यांना मूलबाळ नव्हते. एखादे मूल सांभाळायला घ्यावे असे त्या साधूच्या बायकोला वाटत होते. शेजारच्या गावात, घरोघरी साधू यासाठी गेला. पण तो इतका गरीब होता की त्याला कुणीच मूल देईना.

साधू गरीब होता खरा पण त्याच्याजवळ दैवी शक्ती होती. एक दिवस तो आपल्या झोपडीसमोर बसला होता. तेवढयात वरून उडणाऱ्या एका कावळयाच्या चोचीतून एक उंदीर पडला. साधूच्या बायकोने तो उचलला, त्याची शुश्रूषा केली. मग ती आपल्या नवऱ्याला म्हणाली,

"आपल्याला कुणी मूल तर देतच नाही. मग तुमची दैवी शक्ती वापरून या उंदरालाच तुम्ही मूल का बनवीत नाही?"

साधू हसला. त्याला ते पटले. तो म्हणाला, "ठीक आहे. तुझ्या इच्छेप्रमाणे करतो."



साधूने एक मंत्र म्हटला, आणि आपल्या कमंडलूतून त्याने थोडे तीर्थ त्या उंदरावर शिंपडले. क्षणार्धात त्या उंदराचे एका तान्हया मुलीत रूपांतर झाले.

साधूच्या बायकोला अपार आनंद झाला. तिने त्या मुलीची खूप काळजी घेतली. त्यांना मिळेल त्यातले चांगले चुंगले अन्न तिला खाऊ घातले आणि मोठया प्रेमाने त्यांनी तिचे नाव ठेवले मूषकी.

दिवसामासागणिक मूषकी मोठी होत होती. साधू आणि त्याची बायको तिला आनंदी ठेवण्याची, तिला चांगले शिक्षण देण्याची पराकाष्ठा करीत. ती साहित्य, गणित, नृत्य, संगीत, सगळे शिकली. मूषकी आता वयात आली. लग्नाला झाली. आता तिच्या योग्य वर शोधण्याची साधूला चिंता लागली. त्याची बायको त्याला म्हणाली, "तुम्ही केवढे सामर्थ्यवान एका छोटयाशा उंदराचं रूपातर तुम्ही एका सुंदर मुलीत केलंत. आता आपल्या मुलीसाठी उत्तम वर शोधण्यासाठी तुमच्या सामर्थ्याचा उपयोग करा."

"बरोबर आहे तुझं." साधू म्हणाला, "मी विनंती केली तर सूर्यदेखील माझ्या मुलीशी लग्न करायला तयार होईल."

"खरंच?" त्याची बायको आनंदाने म्हणाली, "खरंच तुमचं सामर्थ्य येवढं आहे? असं जर असेल तर सूर्य जावई म्हणून मला फारच आवडेल. आता जे म्हणालात ते सिद्ध करून दाखवा."

"ठीक आहे." साधू म्हणाला. तो डोळे मिटून ध्यानस्थ बसला. अचानक सूर्य त्याच्यासमोर येऊन उभा राहिला. साधूने आपल्या मुलीशी लग्न करण्याची सूर्याला विनंती केली.

सूर्य म्हणाला, "तुझ्या मुलीशी लग्न करायला माझी काहीच हरकत नाही. पण तिला मी आवडेन अशी तुझी खात्री आहे का?"

साधूने आपल्या मुलीला बोलावून तिचे मत विचारले. ती म्हणाली. "बाबा, तुम्ही निवडलेला वर चांगला आहे. पण तो फार तेजस्वी आहे. याच्यापेक्षा चांगला आणि श्रेष्ठ दुसरा कुणी नाही का?"



सूर्यापेक्षा जास्त चांगला आणि श्रेष्ठ दुसरा कुणीच साधूच्या नजरेसमोर येईना. त्याला निराश आणि विचारमग्न पाहून सूर्य म्हणाला. "मला वाटतं ढग माझ्यापेक्षा चांगला आणि श्रेष्ठ आहे. कारण माझं प्रखर तेज पुष्कळदा तो कमी करतो आणि पृथ्वीपासून मला लपवतोसुद्धा."

येवढे म्हणून सूर्याने त्यांचा निरोप घेतला. लौकरच साधूच्या झोपडीपुढे आला ढग. आता ढगाला मूषकीशी लग्न करतोस का असे विचारण्याआधी त्याने मूषकीलाच विचारले. ढग तुला नवरा म्हणून पसंत आहे का? मूषकीने ढगाकडे क्षणभर पाहून म्हटले, "बाबा, हा नवरा चांगला आहे पण काळा आहे. याच्यापेक्षा चांगला आणि श्रेष्ठ दुसरा कुणी नाही का?"

साधूने ढगाकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिलं. ढग म्हणाला, "माझ्यापेक्षा वारा जास्त श्रेष्ठ आणि चांगला समजायला हरकत नाही. कारण तो मला कित्येकदा आकाशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत ढकलीत नेतो."

ढग परत गेला आणि दुसऱ्याच क्षणी वारा आला. मूषकी त्याच्याकडे पाहून म्हणाली, "बाबा, हा तरुण फार चंचल वाटतो. यापेक्षा चांगला आणि श्रेष्ठ दुसरा कुणी नाही का?"

साधू मोठ्या काळजीत पडला. तेव्हा वारा म्हणाला, "हे बघा, काही काळजी करू



नका. पर्वत माझ्यापेक्षा नक्कीच चांगला आणि श्रेष्ठ आहे कारण माझ्यात येवढा जोर असूनसुद्धा मी त्याला कणभरसुद्धा हालवू शकत नाही. त्याला पाहिल्यावर तुमच्या मुलीचं नक्कीच समाधान होईल."

वारा गेला आणि पर्वत आला. या नव्या वराला पाहून मूषकी म्हणाली, "बाबा, हा मुळीच तरतरीत दिसत नाही. याच्यापेक्षा चांगला आणि श्रेष्ठ दुसरा कुणी नाही का?"

पर्वत ताबडतोब म्हणाला, "आहे तर. उंदराचं काय? माझ्या अंगात भोकं पाडू धजणारा तो एकुलता एक प्राणी आहे. या महत्वाकांक्षी मुलीला तोच योग्य जोडीदार आहे."

पर्वत दिसेनासा झाला आणि उंदीर आला त्याला पाहताक्षणीच मूषकी मोठ्या आनंदाने उद्गारली.

"बाबा हा शूर तरुण काय छान आहे. हा उत्तम, सर्वश्रेष्ठ वर हाताशी असताना तुम्ही मला सूर्य, वारा आणि इतर सगळे का दाखवीत बसलात? बाबा, आता तरी मुळीच वेळ न दवडता मला या उत्तम तरुणाशी लग्न करायची परवानगी दया."

मूषकीचे उंदराशी लग्न झाले आणि आपल्या मानलेल्या आईवडिलांना सोडून ती आपल्या नवऱ्याकडे राहायला गेली.

साधूची बायको एक उसासा सोडून दुःखी स्वरात म्हणाली, "अरेरे आणि मी म्हणत होते हिला उत्तमात उत्तम नवरा मिळावा. पण मूषकीने तिला उत्तम वाटला तोच नवरा निवडला."





## भाग्यरेषा बदलणारा राजपुत्र

एका मोठ्या दाट अरण्यात कुमार नावाचा एक मुलगा आणि त्याची आई दोघे राहात होती. आसपास कित्येक मैलांपर्यंत दुसरे कुठलेही घर नव्हते. केव्हाही बाहेर बघितले की कुमाराला फक्त झाडांच्या रांगाच्या रांगाच दिसायच्या.

त्याला आवाज ऐकू यायचा तो म्हणजे फक्त झऱ्याची झुळझुळ, श्वापदांचे ओरडणे आणि पाखरांचा चिवचिवाट.

कुमार काम करण्याइतका मोठा झाला आणि रोज संध्याकाळी वेगवेगळ्या ठिकाणी जाळी लावू लागला. सकाळी कोणत्यातरी एका जाळ्यात एक कस्तुरीमृग अडकलेला आढळे. दर दोन तीन दिवसांनी दुरून कुठून तरी एक व्यापारी येई. तो कस्तुरीमृग घेऊन जाई आणि त्याच्या मोबदल्यात अन्न-वस्त्र देऊन जाई. त्याखेरीज तो कुमाराला वाचण्यासाठी ताडाच्या पानांची पुस्तके आणी.





कधी कधी दूरदूरच्या गावातून त्याच्या वयाचे मुलगे जंगलांत फळे, मुळे, मोरपिसे गोळा करण्यासाठी येत. त्यांना कुमार फार आवडत असे. एक दिवस ते कुमाराला म्हणाले,

"अरे, तुझ्याबरोबर खेळण्यासाठी, गाणी गाण्यासाठी आम्हाला रोज यावंसं वाटतं, पण मनात आलं की जंगलात येणं काही आम्हांला शक्य होत नाही. जंगल फार दूर आहे. रस्ताही धोक्याचा आहे. तूच आमच्याकडे येऊन आमच्याबरोबर का राहात नाहीस? असं एकलकोंड्यासारखं कशासाठी राहातोस?"

कुमाराचे मित्र गेले आणि तो आपल्या आईकडे धावत जाऊन म्हणाला, "आई, आपण या दाट जंगलातच कशासाठी राहायचं? माझे सगळे मित्र एकमेकाजवळ राहातात. आपणही त्यांच्यामध्ये जाऊन का राहात नाही?"

त्याच्या आईने काहीच उत्तर दिले नाही. कुमारने पुन्हा तोच प्रश्न विचारला. तेव्हा त्याची आई म्हणाली, "आपल्याला कायम या जंगलातच राहायला हवं. इतर लोकांमध्ये जाऊन राहणं आपल्या दृष्टीने सुरक्षितपणाचं नाही. यापेक्षा मी तुला आणखी काही सांगू शकत नाही."

"नाही आई, तू मला आणखी सांगितलंच पाहिजेस." कुमाराने हट्ट धरला.

"नाही बाळा, तू आणखी काही ऐकलंस तर तुला वाईट वाटेल." त्याची आई म्हणाली.

"मुळीच नाही. तू कितीही दुःखदायक गोष्ट सांगितलीस तरीही मी आनंदी राहण्याचं वचन देतो."

त्याची आई पुन्हा गप्प राहिली पण तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. कुमार हळूच म्हणाला, "आई, तुला जर दुःख होत असेल तर मला काहीच सांगू नकोस."

"नाही बेटा." त्याची आई म्हणाली, "कदाचित तुला सगळं माहीत होण्याची हीच वेळ आहे. तुला जर सगळं समजलं तर तू कदाचित जास्त काळजीपूर्वक वागशील" आणि येवढे बोलून त्याच्या आईने आपली कहाणी सुरू केली.

"तू एक वर्षाचा होतास तेव्हापासून आपण या अरण्यात राहातो आहोत. साहजिकच आपण पूर्वी कुठे राहात होतो ते तुला आठवणं शक्य नाही. तुला ऐकून आश्चर्य वाटेल पण आपण एका मोठ्या भव्य राजवाड्यात राहात होतो कारण तुझे

बाबा होते या देशाचे राजे. तू त्यांचा एकुलता एक मुलगा. म्हणजे राज्याचा वारस तूच होतास. पण दैव आपल्याला अनुकूल नव्हतं.

"तुझा जन्म झाला त्या रात्री सबंध राजवाड्यात उत्सव साजरा होत होता. मी खूप दमले होते त्यामुळे लौकरच गाढ झोपी गेले. मध्यरात्री मला जाग आली. माझ्या दासदासी, दाया सगळ्या गाढ झोपल्या होत्या. मी हळूच डोळे उघडले. आणि काय आश्चर्य! मी एक तेजोमूर्ती माझ्या खोलीतून बाहेर निघून जाताना बघितली. मी ऐकलं होतं की मूल जन्माला आल्याबरोबर लगेच कर्मदेव त्या मुलाचं भविष्य त्याच्या कपाळावर लिहितो. कर्मदेव नेहमी येतो जातो पण कुणाला दिसत नाही. पण क्वचित एखादया क्षणी तो दिसतो.



"माझ्या ताबडतोब लक्षात आलं की माझ्यासमोरची ती तेजोमूर्ती दुसरी तिसरी कुणी नसून तो कर्मदेव होता. मी झटकन उठले आणि त्याच्यापुढे गुडघे टेकून प्रार्थना केली, "माझ्या बाळाच्या नशिबात काय आहे ते सांगा." पण कर्मदेवाने ते गुपित फोडण्याचे नाकारले. मी पण मागे हटले नाही. मी कर्मदेवाला सांगितले. "मला बाळाचं भविष्य सांगितल्याशिवाय मी तुम्हांला जाऊ देणार नाही." शेवटी त्याला सांगणे भागच पडले. पण त्याचे ते भविष्यकथनाचे शब्द एखादया धोंड्याप्रमाणे माझ्या डोक्यावर आदळले. त्याने मला सांगितले, की जन्मभर गरिबीत राहाणे तुझ्या मुलाच्या भविष्यात लिहिलेले आहे.

"लौकरच तुझे बाबा, राजेसाहेब एका अपघातात वारले. तुझ्या बाबांचा पंतप्रधानावर फार विश्वास होता. त्यामुळे त्याचं सामर्थ्य खूप वाढलं होतं. त्याने आपल्या दोघांनाही ठार मारण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने मला त्याचे बेत समजले. माझ्या दृष्टीने तुझा जीव राज्यापेक्षा जास्त मोलाचा होता. तेव्हा एका रात्री मी तेथून सटकले आणि जंगलात आले. तो दुष्ट पंतप्रधान आता राजा आहे. आपण इथे राहातो ते त्याला माहीत नाही. ते समजलं तर तो आपल्याला ठार मारण्याचा प्रयत्न करील. म्हणूनच हे अरण्य सोडून कुठेही जाण्याची माझी इच्छा नाही.

"कर्मदेवाने मला आश्वासन दिलं की गरीब असलास तरीही तू कधी उपाशी राहणार नाहीस. कारण तुझ्या जाळ्यात रोज एक कस्तुरीमृग सापडलाच पाहिजे असा नियम केलेला होता. कित्येक वर्षं रोज संध्याकाळी मी जाळी लावीत असे. पण गेल्या दोन वर्षांपासून तू हे काम हाती घेतलंस. नुसत्या विचारानेसुद्धा माझं हृदय गलबलतं पण याचप्रकारे तुला तुझं आयुष्य घालवावं लागेल." कुमार आईचे सांगणे ऐकण्यात पार गढून गेला होता. थोड्या वेळानंतर तो जोरात म्हणाला. "आई तू एके काळची राणी, सध्या राजमाता म्हणून तुझा मान राखला जाणं योग्य होतं त्या तुला अशा तऱ्हेने राहावं लागतं याचं मला फार दुःख होतं. माझ्यापुरतं म्हणशील तर मी दुसरं कसलंच जीवन अनुभवलेलं नाही. जंगलात राहण्याचं मला काहीच वाटत नाही. पण आता मला माझा पूर्वेतिहास आणि त्या पंतप्रधानाचा दुष्टपणा समजल्यानंतर माझ्याच्याने स्वस्थ बसवणार नाही. माझ्या बाबांचं राज्य अन्यायाने बळकाविणाऱ्या त्या दुष्टाच्या पंजातून हिसकावून परत मिळविण्यासाठी मला काहीतरी केलंच पाहिजे."

त्याची आई म्हणाली, "बाळा, असं चिडून काय उपयोग? तुझ्या दैवाचाच हा कायदा आहे."

"मी माझं दैव पालटीन." कुमार हे अशा काही निग्रही स्वरात म्हणाला की यावेळी गप्प बसणेच शहाणपणाचे आहे असे त्याच्या आईला वाटले.

कुमार बराच वेळ गप्प राहिला. विचारात गुंग झाला होता. मग अचानकपणे त्याचा चेहरा उजळला "आई, मला सांग, रोज रात्री एक कस्तुरीमृग पकडणं माझ्या नशिबात लिहिले असल्याचे कर्मदेवाने तुला आश्वासन दिलं होतं?"


"हो." आई म्हणाली.

"ठीक आहे. दैवाशी सुरू होणाऱ्या लढाईतला हा माझा पहिला पवित्रा ठरेल." कुमार म्हणाला.

त्या संध्याकाळी, नेहमीच्या पध्दतीप्रमाणे दहा वेगवेगळ्या ठिकाणी जाळी लावण्याऐवजी कुमाराने फक्त पाचच जाळी पसरली. तरीही त्यापैकी एका जाळ्यात एक मृग सापडलाच. त्यानंतर दुसऱ्या संध्याकाळी त्याने फक्त एकच जाळे लावले. तरीही एक मृग त्यात अडकलेला आढळला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी नेहमीच्या ठरलेल्या जागी जाळे न लावता त्याने ते आपल्या झोपडीच्या छपरावर लावले. तरीही त्यात एक मृग सापडलाच.

पुढच्या खेपेस कुमाराने एका ओकवृक्षावर जाळे बांधले. सकाळी त्यातही एक मृग सापडला.





त्यानंतरच्या संध्याकाळी, कुमाराने पुन्हा त्याच ओक वृक्षावर जाळे बांधले. पण त्यावेळी त्याने झाडाभोवती जाळ पेटवून ठेवला.

अचानकपणे रात्री खूप उशिरा कुमार जागा झाला. कुणीतरी त्याच्या बिछान्याजवळ धापा टाकीत होते. त्याच्यापुढे एक तेजस्वी अनोळखी व्यक्ती उभी होती–पण अर्ध शरीर भाजल्या अवस्थेत. तो कर्मदेव होता.

कर्मदेव रागाने म्हणाला, "झाडावर जाळं बांधून शिवाय त्याभोवती जाळ पेटवून देण्याचा अर्थ काय? हा काय चावटपणा आहे?"

"चावटपणा काहीच नाही. मी फक्त माझ्या बाबांच्या पंतप्रधानाने केलेला चावटपणा थांबवायचा प्रयत्न करीत आहे. मला माझं राज्य परत हवं आहे." कुमार म्हणाला.

"पण तुझ्या नशिबात गरीब म्हणून राहणंच लिहिलेलं आहे." कर्मदेवाने हरकत घेतली.

"आणि रोज रात्री एक मृग आपल्या जाळ्यात पकडणंही माझ्या नशिबात लिहिलेलं आहे. मला वाटले तेथे मी जाळं बांधीन. तुला त्याबद्दल तक्रार करण्याचं काय कारण?" कुमार म्हणाला.



"पण रोज रात्री एक मृग पकडणं तुझ्या नशिबात लिहिलेलं असल्यामुळे मला एक मृग झाडाच्या शेंड्यापर्यंत वाहून नेऊन जाळ्यात ठेवावा लागतो हे नाही समजत तुला? मी हे किती दिवस करीत राहायचं?" कर्मदेवाने चिडून तक्रार केली.

"उद्या मी जंगलातल्या सर्वांत उंच झाडाच्या शेंड्यावर जाळं बांधीन आणि त्याच्याभोवतीही जाळ पेटवून ठेवीन. येवढंच नव्हे तर मी त्या जाळावर मोहरीचं तेल शिंपडीन." कुमार निर्विकारपणे म्हणाला. कर्मदेवाने हताशपणे उसासा सोडला. क्षणभर विचार केला आणि मग हसून म्हणाला,

"तू फार हुशार आहेस, तुझ्या या निर्धारामुळे मला तुझी भाग्यरेषा पुन्हा लिहावी लागेल."

त्या रात्री कर्मदेवाने कुमाराच्या कपाळावर लिहिलेली पूर्वीची भाग्यरेषा पुसून टाकली आणि त्याच्या जीवनात पुढे येणारे प्रसंग पुन्हा ललाटी रेखाटले.

थोड्याच दिवसांनी राज्यात बंड झाले, पंतप्रधान मारला गेला व कुमार राजवाड्यात गेला. त्याच्या म्हाताऱ्या दाईने त्याला ओळखले. लौकरच सर्वांना तो परत आल्याचे कळले आणि सर्वांनी त्याचे एकमताने राजा म्हणून स्वागत केले.





## दोन मुली आणि एक कमळ

तीनशे फूट उंच अशा एका टेकडीवर एक विचित्र जुने देऊळ होते. एक कुबडा म्हातारा तेथील पुजारी होता. देवळाच्या मधोमध एक सुंदर मूर्ती होती. उषा आणि ललिता या दोघी प्रियमैत्रिणी. त्या प्रेमळ पुजाऱ्याशी गप्पा मारायला त्यांना आवडे. रंगीबेरंगी फुलांनी तो मूर्तीला सजवीत असे तेव्हा या दोघी मजेत बघत राहात.



पुष्कळदा सकाळी उषा आणि ललिता फुलांच्या ताटव्यांतून नाचत, उड्या मारीत गात, लपंडाव खेळत, टेकडी चढून जात. आपल्या झोपेतून जागे झालेले एखादे कबूतराचे पिल्लू म्हणे, "गुटुर्गू....काय राक्षसी कबूतरं आहेत ही." एखादी खार सुर्रकन् तेथून जाता जाता आपली झुबकेदार शेपूट हालवीत म्हणे, "काय उद्धटपणा हा. मला लपंडाव कसा खेळायचा, ते शिकवण्याचं यांचं धारिष्ट्य तर पाहा."

एखादा चमकदार पिवळ्या रंगाचा गाणारा पक्षी कुलकुल करी, "या आजकालच्या वेडपड पोरी. यांचे झगे माझ्या पोटाच्या रंगाचे आहेत. मला चिडवायचा प्रयत्न चाललाय काय यांचा?

पण ती रंगीबेरंगी-गुलाबी, निळी, पिवळी, जांभळी रस्त्याच्या कडेला हारीने उमललेली फुले वाऱ्यावर हळूहळू डोलत हळूच गुणगुणायची, "ललिता आणि उषा, आम्ही पूर्ण उमललो आहो. आम्हांला खुडून घ्या. आम्ही त्या पलीकडच्या देवळातल्या मूर्तीला छान सजवू."

उषा आणि ललिता मोठ्या मजेत फुले खुडायच्या-अर्थातच फुलांवर उडणाऱ्या फुलपाखरांना वाईट वाटायचे-आणि ती फुले पुजाऱ्याला नेऊन दयायच्या, वृद्ध पुजाऱ्याला डोळ्यांनी चांगले दिसायचे नाही म्हणून तो फुलांच्या पाकळ्यांवरून हात फिरवायचा आणि त्यांची नावे बरोबर ओळखायचा.





तो मूर्ती सजवायचा आणि मुलींशी गप्पा मारायचा. "आणि जाईची फुलं आणलीत वाटतं? छान, देव तुम्हांला पावित्र्य देईल." किंवा, "हं, म्हणजे आज गुलाब आणलेत तर. देव तुम्हांला प्रेम आणि शांती देईल."

एक दिवस उषाने विचारले, "समजा मी कमळ वाहिलं तर?" पुजारी म्हणाला, "कमळ? सगळ्या फुलांची राणी? कमळ म्हणजे ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव. परमेश्वराला तुम्ही भक्तिपूर्वक कमळ वाहयलंत तर तुम्ही त्याच्या जवळ जाता. तुम्ही एक जास्त चांगली व्यक्ती बनता."

उषाला फार आनंद झाला. ती नाचायला लागली, उड्या मारायला लागली. ललिता गोंधळून गेली. तिने विचारले, "अग पण तुला कमळ मिळणार तरी कुठे?"

उषा गूढपणे हसली आणि तिने उत्तर दयायचे नाकारले. पण थोडा वेळ मनधरणी केल्यावर तिने नाइलाजाने गुपित फोडले. "डोंगराच्या पलीकडे एक जुनं तळं आहे ते आठवतं? मी तेथे कमळाची एक कळी पाहिली. आज रात्री ती उमलेल. उदया सकाळी अगदी लौकर ती खुडून मी इकडे घेऊन येईन."

"पण ते तळं माझ्या बाबांच्या मालकीचं आहे. "ललिताने किंचाळून हरकत घेतली.

उषाने याचा आधी विचारच केला नव्हता. पण तिचा निर्धार कायम होता. "असेल." ती म्हणाली, "पण तिकडे कधीच कुणी जात नाही. ते फूल उमलतं असतं आणि कुणालाही न समजता कोमेजून गेलं असतं. मी ते पाहिलं. अर्थातच ते तोडायचा मला अधिकारच आहे."

"पण काय म्हणून? ते तळं माझ्या बाबांच्या मालकीचं आहे."

"म्हणून काय झालं?"

"तेव्हा फक्त मीच ते फूल तोडू शकते." त्या संध्याकाळी त्या दोघी मैत्रिणींनी न हसता एकमेकींचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशी, अरुणोदयाच्या सुमारास उषा तळ्यापाशी गेली. आकाशाचा धूसर रंग बदलून तांबूस छटा पसरेपर्यंत ती रस्ताभर धावत होती. तळे नजरेच्या टप्प्यात आल्याबरोबर तिला फार आनंद झाला पण आपल्या मैत्रिणीबद्दल तिला





थोडे वाईटही वाटले, बिच्चारी ललिता.

आणि अचानक जणू आपले हृदय बंद पडते आहेसे तिला वाटले. पहाटेच्या त्या अंधुक प्रकाशात कुणीतरी तळ्यातून वर येताना तिला दिसले. हो ती ललिताच होती आणि तिच्या हातात ते कमळ होते.





उषा एका झुडपामागे लपली. ललिता घाईघाईने टेकडी चढू लागली. आपले अश्रू कसेबसे आवरून धरीत उषा तिच्या मागोमाग निघाली. आपण जिला आपली प्रिय मैत्रीण समजत होतो त्या मुलीने केलेला हा विश्वासघात तिच्या मनाला फार झोंबला.

ललिता पुजाऱ्यासमोर येऊन उभी राहिली. पुजारी नुकताच झऱ्यावर आंघोळ करून आला होता आणि आता पूजेला बसणार होता. "कोण आहे ते?" म्हाताऱ्याने विचारले.

"मी, मी कमळ आणलं आहे."

"कमळ? वा: फारच छान. मी आता हे फूल तुझ्या नावाने मूर्तीला वाहतो. तू उषा आहेस होय ना? मला नीटसं स्पष्ट दिसत नाही आणि मी उषा आणि ललिता दोघींमध्ये घोटाळा करतो."

ललिताने उत्तर दिले नाही. उषा तेथेच बाजूला लपली होती आणि मागून डोकावून पाहात होती. तिला आता रडू मुळीच आवरेना.

"तू उषाच ना?" पुजाऱ्याने पुन्हा विचारले.

ललिता एकदम म्हणाली, "हो. हो. देवाला उषाच्याच नावाने फूल वाहा."

"नको." उषा मागून ओरडली. "पंडितजी, ललितानेच ते फूल आणले." "पण ते फूल शोधून काढलंस तू. मी ते फक्त खुडून आणलं." ललिता म्हणाली. तिच्या गालावरून अश्रूंच्या धारा ओघळत होत्या.

"पण ते कमळ तुझ्या मालकीचं होतं." उषा म्हणाली. आता तिच्या गालावरूनही अश्रू ओघळू लागले होते.

"म्हणून काय झालं?"

"काय झालं म्हणजे? तूच फक्त देवाला ते वाहू शकतेस."

यानंतर पुजारी मध्ये पडून मोठ्या प्रेमाने म्हणाला, "पोरींनो, ते काहीही असो. मी देवाला हे फूल वाहीन तेव्हा तुम्हां दोघींची नावं उच्चारीन. तुम्हां दोघींच्यावरही कृपा करील तो. तुम्ही दोघीही त्याला प्रिय व्हाल. तुम्ही दोघीही पूर्वीपेक्षा जास्त चांगल्या व्यक्ती व्हाल."

परतीच्या वाटेवर उषा आणि ललिता एकमेकींकडे पाहून हसल्या. त्यांना जाणवले की आपण आतासुद्धा चांगल्या व्यक्ती झालो आहोत. त्या नेहमीप्रमाणे उड्या मारू लागल्या, नाचल्या, गाऊ लागल्या. आणि पुन्हा एकदा ते झोपाळू कबुतराचे पिल्लू जागे होऊन आपली झोपमोड झाल्याबद्दल गुटुरगू गुटुरगू करू लागले.



*Printed at* J.J. Offset Printers, Patparganj, Delhi-92.